कला अकादमी गोवा
पणजी-गोवा

कअ/हिंसंवि/२०२४-२५/२७१२
दि. २१/०३/२५

# कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमीच्या हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभागातर्फे शनिवार दि. २९ मार्च २०२५ रोजी "प्रतिभा" या उपक्रमाअंतर्गत मासिक संगीत सभेचे आयोजन करण्यात येणार आहे. ही संगीत सभा कला अकादमीच्या कृष्णकक्षात संपन्न होणार आहे.

दुपारी ठीक ३.३० वाजता मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्‌घाटन करण्यात येईल व तद्‌नंतर संगीत विभागातील विद्यार्थ्यांचा शास्त्रीय गायन, वादन व नृत्याचा कार्यक्रम होईल. कार्यक्रमाची सुरुवात भरतनाटयम्‌ नृत्याने होणार आहे त्यामध्ये कु. अनुश्री कोली, कु. मुस्कान खानोलकर, कु. कला नागा चैत्राली, कु. अमिषा अडकोणकर, सौ. मंजु महाले-नाईक, कु. रश्मी नावेलकर या विद्यार्थीनी आपली कला सादर करणार आहेत. त्यानंतर कु. सदानंद झो यांचे शास्त्रीय गायन होणार आहे. शास्त्रीय गायनानंतर तबला सहवादनाचा कार्यक्रम होणार आहे त्यामध्ये कु. कामेश रेडकर, कु. दिपतेज रेवोडकर व कु. जीत सावंत हे विद्यार्थी आपली कला सादर करणार आहेत. तद्‌नंतर कु. सिध्दी नाईक हिचे बासरीवादन होईल. बासरी वादनानंतर कला अकादमीच्या केपे संगीत केंद्रातील विद्यार्थीनी कु. नेहा नाईक, कु. तुळशी वेळीप, कु. श्रध्दा च्यारी व कु. अंशिका राव यांचे शास्त्रीय गायन होईल. त्यानंतर कु. विजय सावंत यांचे संवादिनी सोलो वादन होईल व कार्यक्रमाची सांगता कु. तनया चोपडेकर कु. पियु निमकर, कु. गौरक्षा साळसकर, कु. पुर्वा गावस व कु हर्षिता च्यारी यांच्या कथ्थक नृत्याने होणार आहे. सर्व विद्यार्थी कलाकारांना श्री. सुरज मोरजकर, श्री. भार्गवराम गर्दे, श्री. संतूर नाईक, श्री. प्रज्योत ताम्हणकर व कु. राघव भट यांची तबलासाथ तर श्री शैलेश गांवकर व श्री. चारुदत्त गावस यांची संवादिनी साथ लाभणार आहे. तसेच नृत्याच्या कार्यक्रमासाठी सौ. सिमा शिकेरकर यांची पढंतची साथ, डॉ. सपना नाईक यांची नटवंगमची साथ, डॉ. दिप्ता रुबसुंदरम यांची गायन साथ व चेथनमुर्ती डी. आर यांची मृदंगमची साथसंगत कलाकारांना लाभणार आहे.

हा कार्यक्रम सर्व रसिक श्रोत्यांसाठी खुला असून मोठया संख्येने या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन हिदुस्थानी संगीत व नृत्य विभागातर्फे करण्यात आले आहे.

हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभाग
कला अकादमी गोवा

प्रति

१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड

७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)